Teachingninja.in

Latest Govt Job updates

Private Job updates

Free Mock tests available

Visit - teachingninja.in

# MAH B.Ed CET

## Previous Year Paper

### 14 Jun, 2014

Teachingninja.in

# बी. एड. सीईटी प्रवेशपूर्व परीक्षा

## पेपर १४ जून-२०१४

वेळ-६० मिनीटे गुण-५०

1. सचिनचे आजचे वय अमितच्या वयाच्या दुप्पट आहे. दोघांच्या आजच्या वयाची बेरीज ३६ वर्षे असल्यास सचिनचे ७ वर्षांनंतरचे वय किती?
   A) 19 B) 24 C) 31 D) 40

2. राजू हा संजूपेक्षा मोठा पण विजूपेक्षा लहान आहे. नीला ही संजूपेक्षा लहान असून टीनापेक्षा मोठी आहे, तर सर्वात मोठे कोण?
   A) राजू B) टीना C) विजू D) संजू


3. अपूर्वा उत्तरेकडे तोंड करून उभी आहे, ती उजवीकडे काटकोनात वळून 4 कि.मी. अंतर गेली नंतर पुन्हा उजवीकडे काटकोनात वळून 6 कि.मी. अंतर गेली, त्यानंतर डावीकडे काटकोनात वळून 4 कि.मी. अंतर गेली तर तर आता ती मूळच्या ठिकाणापासून किती अंतरावर आहे?
   A) 5 कि.मी. B) 10 कि.मी. C) 14 कि.मी. D) 25 कि.मी.

4. राधा व रमा या बहिणी आहेत, सरला व विमल याही बहिणी आहेत, सरलाचे वडील हे रमाचे भाऊ आहेत तर राधा विमलची कोण?
   A) बहीण B) भाची C) नणंद D) आत्या

5. जर चोराला पोलीस म्हटले, पोलिसाला वकील म्हटले आणि वकिलाला न्यायाधीश म्हटले तर खिसेकापूला कोण पकडेल?
   A) चोर B) पोलीस C) वकील D) न्यायाधीश


6. पहिल्या दोन पदांत जो संबंध आहे, तोच संबंध तिसऱ्या व चौथ्या पदांत आहे. गाळलेले पद ओळखा.
   सहारा : वाळवंट : : ऑस्ट्रेलिया : ?
   A) खंड B) बेट C) बर्फाळप्रदेश D) वाळवंट

7. परस्परसंबंधदर्शक योग्य आकृतीची निवड करा.
   सुतार, व्यावसायिक, कुंभार, शिंपी



A) B) C) D)

8. खालील आकृतीत किती चौरस आहेत?



A) 12 B) 12 C) 13 D) 11

9. खालीलपैकी वेगळी आकृती ओळखा.



A) B) C) D)




Teachingninja.in


10. एका सोंगटीच्या दोन स्थिती खाली दिलेल्या आहेत. यावरून सोंगटीवरील एक ठिपका असलेल्या बाजूच्या विरुद्ध बाजूला किती ठिपके असतील?



A) सहा B) पाच C) तीन D) दोन

11. टिंबांकित रेषेतून खाली दिलेल्या आकृतीची घडी केल्यास ही आकृती कशी दिसेल?





A) B) C) D)


12. जर सन 2013 मध्ये प्रजासत्ताकदिन शनिवारी आला असेल, तर त्याच वर्षी बालदिन कोणत्या वारी होता?

A) गुरूवार B) शनिवार C) बुधवार D) शुक्रवार

13. एका सांकेतिक लिपीत DAD हा शब्द 525 असा लिहितात, तर MAD हा शब्द कसा लिहिता येईल?

A) 1425 B) 1325 C) 1224 D) 1524

14. पुढील पहिल्या दोन आकृत्यांमधील संबंधाचा विचार करून तिसऱ्या आकृतीशी संबंध असणारी चौथी आकृती कोणती ते ओळखा.





A) B) C) D)

15. पुढील मालिकेतील रिक्त स्थानी कोणती संख्या येईल? 7497 : 525 : ? : 111

A) 321 B) 393 C) 273 D) 333

16. शिक्षणाचे कार्य म्हणजे ----------

A) बालकांच्या सुप्त गुणांच्या विकासासाठी वातावरण पुरविणे.

B) अद्ययावत व उपयुक्त ज्ञान देणे.

C) समाजोपयोगी उत्पादक कार्यात बालकांना गुंतविणे.

D) स्पर्धात्मक जगात प्रवेशासाठी बालकांना तयार करणे.

17. प्राथमिक स्तरावर मातृभाषेतून शिक्षणाची शिफारस केली जाते कारण -------

A) मातृभाषेतून शिक्षण देणाऱ्या शाळांमध्ये प्रवेश सुलभ असतो.

B) इंग्लिश माध्यमाच्या शाळा जास्त शुल्क आकारतात.



Teachingninja.in

C) बालकांना मातृभाषेतून संकल्पनांचे आकलन होते.
D) मातृभाषेतून शिकल्यास बालकांना जास्त गुण मिळतात.

18. वर्गसंप्रेषण प्रभावी म्हणता येईल जेव्हा --------
A) शिकणाऱ्यांना संबोध समजतात.
B) शिकणारे लक्ष देतात.
C) शिक्षक सुबोध भाषा वापरतात.
D) शिक्षक देहबोलीचा प्रभावी वापर करतात.

19. "भारताचे भवितव्य वर्गांमध्ये घडते आहे." यातून असे ध्वनित होते की -------
A) भारताचे भवितव्य शिक्षकांच्या दर्जावर अवलंबून आहे.
B) शिक्षकांना सातत्यपूर्ण प्रशिक्षणाची आवश्यकता आहे.
C) शिक्षकांवर भावी पिढी घडविण्याचे उत्तरदायित्त्व आहे.
D) शिक्षकांवर चांगल्या अध्यापनाची जबाबदारी आहे.

20. जर एखादा विद्यार्थी गणितामध्ये वारंवार नापास होत असेल तर शिक्षक म्हणून तुम्ही काय कराल?
A) त्याला शाळा सोडण्याचा सल्ला देऊ
B) शिकण्यातील अडचणी शोधून उपाय करू
C) त्याला गाईड विकत घेऊन देऊ
D) त्याला खाजगी शिकवणीला जाण्याचा सल्ला देऊ

21. तुम्ही संगणक शिक्षक आहात. एका विद्यार्थिनीने तिच्या ई-मेल खात्यावर सातत्याने धमकीवजा व अश्लील संदेश येत असल्याची तक्रार केली आहे. तुम्ही काय कराल?
A) तिला ई-मेल खाते बंद करण्याची सूचना द्याल.
B) अशा ई-मेलकडे दुर्लक्ष करण्याचा सल्ला द्याल.
C) तक्रारीची दखल घेऊन उचित कार्यवाही कराल.
D) तक्रार वरिष्ठांच्या लक्षात आणून द्याल.

22. चांगला शिक्षक खालीलपैकी कोणत्या कृतीला कमी महत्त्व देईल?
A) प्रश्न विचारणे
B) सोदाहरण स्पष्टीकरण करणे
C) विद्यार्थ्यांना उत्तरे लिहून देणे
D) फलकावर आकृती काढणे.

23. विद्यार्थ्यांच्या नेतृत्व गुणांचा विकास करण्यासाठी तुम्ही काय कराल?
A) मुलांचा दैनंदिन परिपाठात सहभाग वाढविणार
B) सांस्कृतिक कार्यक्रमात विद्यार्थी सहभागासाठी प्रोत्साहन देणार
C) विविध स्पर्धांच्या आयोजनाची जबाबदारी विद्यार्थ्यांवर सोपविणार
D) सामाजिक समस्येवर लढणाऱ्या नेत्यांची भाषणे दाखविणार

24. शालेय गणवेशामुळे कोणते मूल्य रूजविले जाते?
A) न्याय
B) स्वातंत्र्य
C) समता
D) देशप्रेम

25. एका नव्याने सुरु झालेल्या शाळेत शारीरिक शिक्षणाच्या शिक्षकांनी मैदान अपुरे असल्याची तक्रार केली. मुख्याध्यापक या नात्याने तुमची त्वरित कृती कोणती असेल?
A) मैदानासाठी अनुदान मिळावे यासाठी शासनाकडे प्रस्ताव पाठविणे
B) जवळच्या शाळेला त्यांचे मैदान वापराबाबत विनंती करणे
C) मैदान आवश्यक नसणाऱ्या खेळांचे जास्त साहित्य खरेदी करणे
D) तक्रारीची माहिती व्यवस्थापन समितीला देणे

26. मुक्त पुस्तक परीक्षांची शिफारस करण्याचे मुख्य कारण म्हणजे त्यातून ------


Teachingninja.in

A) आकलन व विचारकौशल्यांचे परीक्षण होते.
B) मूल्यमापन तणावरहित होते.
C) पर्यवेक्षण व मूल्यांकनाचा ताण कमी होतो.
D) परीक्षेतील गैरप्रकार कमी होतात.

27. अभ्यासपूरक कार्यक्रमाबद्दल शिक्षक म्हणून माझी भूमिका खालीलप्रमाणे असेल ------
A) विद्यार्थ्यांचा सहभाग वाढविणे.
B) नियोजनाच्या वेळी मदत करणे.
C) सांस्कृतिक कार्यक्रमांत स्वतः सहभाग घेणे.
D) आवश्यकतेनुसार मार्गदर्शन करणे.

28. शालेय माध्यान्ह भोजनाच्या वितरणाची जबाबदारी तुमच्याकडे दिली तर तुम्ही ------
A) हे काम माझे नाही म्हणून मुख्याध्यापकांना सांगाल.
B) दिलेली जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडाल.
C) मुख्याध्यापकांविरोधात उच्चपदस्थांकडे तक्रार कराल.
D) अपरिहायता म्हणून नाखुशीने काम कराल.

29. जर शिक्षक 'माळी' आहे तर विद्यार्थी ------ आहे.
A) फूल
B) बीज
C) पाणी
D) हिरवळ

30. शाळेतील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक संपादन वाढविण्यासाठी शिक्षक या नात्याने तुम्ही काय कराल?
A) शिक्षणतज्ज्ञांची व्याख्याने आयोजित करु.
B) पालकांच्या सभांचे आयोजन करू.
C) विद्यार्थ्यांना गाईड्स आणि नोट्स देऊ.
D) विद्यार्थ्यांना अभ्यासाची तंत्रे शिकवू.

31. रक्ताभिसरण प्रक्रिया तुम्ही कशी शिकवाल?
A) तक्त्याद्वारे
B) व्याख्यानाद्वारे
C) प्रतिकृतीद्वारे
D) संगणकाद्वारे

32. लोकशाहीचे मूल्ये रूजविण्यासाठी शिक्षकाचे मुख्य कार्य कोणते?
A) अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्यांना सक्षम बनविणे.
B) विद्यार्थी आज्ञाधारक होण्यासाठी नियम तयार करणे.
C) सक्षम आणि आत्मनिर्भर होण्यासाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणे.
D) विद्यार्थी नेत्यांची नियुक्ती करणे.

33. ------ हे शिक्षकाचे ध्येय असावे.
A) विद्यार्थ्यांना परीक्षेत उत्तीर्ण करणे.
B) विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास करणे.
C) विद्यार्थ्यांना शिस्त लावणे.
D) विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी तयार करणे.

34. मुक्तशिक्षणपद्धती ------ भर देते.
A) स्वयंअध्ययनावर
B) अध्यापनावर
C) प्रश्नपत्रिका सोडविण्यावर
D) निकाल उंचावण्यावर

35. जर अध्ययन ----- असेल तर ते आनंददायी बनते.
A) कृतिधिष्ठित
B) आंतरक्रियात्मक
C) ऑनलाइन
D) स्वप्रेरित

36. 'घुमर' हे नृत्य कोणत्या राज्याशी संबंधित आहे?
A) गुजरात
B) मिझोराम
C) राजस्थान
D). मणिपूर

37. जागतिक महिला क्रिकेट चषक-2013 ही ---------- या देशाने जिंकला.
A) ऑस्ट्रेलिया
B) वेस्ट इंडिज
C) पाकिस्तान
D) भारत



Teachingninja.in

38. मोफत व सक्तीचे शिक्षण हा मूलभूत हक्क ------ घटनादुरुस्तीनुसार देण्यात आला आहे.
A) 86 वी B) 94 वी C) 65 वी D) 76 वी

39. कोणाच्या सन्मानार्थ 28 फेब्रुवारी 'विज्ञानदिन' म्हणून साजरा केला जातो?
A) सी.व्ही.रामन B) जगदीशचंद्र बोस C) होमी भाभा D) विक्रम साराभाई

40. ------ या वापर सोशल नेटवर्किंगसाठी केला जात नाही.
A) व्हॉट्सअॅप B) ट्वीटर C) फेसबुक D) आयफी

41. IIFA चित्रपट उत्कृष्ट अभिनेत्रीचा पुरस्कार 2013 ------ मिळाला.
A) प्रियांका चोप्राला B) करीना कपूरला C) विद्या बालनला D) श्रद्धा कपूरला

42. महाराष्ट्रातून लोकसभेचे ------ सदस्य निवडले जातात.
A) 40 B) 42 C)50 D) 48

43. धातू उष्णतेचे सुवाहक असतात कारण ------
A) धातूंचा पृष्ठभाग परावर्तक असतो.
B) धातूमधील अणू एकमेकांपासून दूर असतात
C) धातूचे अणू नियमित धडका देतात
D) धातूमध्ये मुक्त इलेक्ट्रॉन असतात.

44. ------ हे कालिदास लिखित काव्य आहे.
A) महाभाष्य B) हर्षचरित C) मेघदूत D) मुद्राराक्षस

45. भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सिमला करार ------ साली झाला.
A) 1962 B) 1965 C)1972 D) 1984

46. 'नाथसागर' हे नाव ------ या धरणाला दिलेले आहे.
A) गंगापूर B) भंडारदरा C) जायकवाडी D) राधानगरी

47. ऊर्जेच्या क्रमवार संक्रमणाला ------ म्हणतात.
A) परिसंस्था B) अन्नसाखळी C) पोषणपातळी D) अन्नस्तूप

48. स्थानिक स्वराज्य संस्था प्रथमत: ------ राज्यात तयार झाल्या.
A) महाराष्ट्र B) राजस्थान C) मध्य प्रदेश D) अरुणाचल प्रदेश

49. ------ यांनी आर्यसमाजाची स्थापना केली.
A) राजा राममोहन रॉय
B) डॉ. आत्माराम पांडुरंग
C) ईश्वरचंद्र विद्यासागर
D) स्वामी दयानंद सरस्वती

50. वनाखाली सर्वाधिक क्षेत्र असलेले राज्य कोणते ?
A) मध्य प्रदेश B) महाराष्ट्र C) हिमाचल प्रदेश D) उत्तराखंड

-----

## उत्तर सूची

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१-C | ०२-C | ०३-B | ०४-D | ०५-C | ०६-A | ०७-A |
| ०८-C | ०९-B | १०-A | ११-B | १२-A | १३-A | १४-A |
| १५-B | १६-A | १७-C | १८-A | १९-C | २०-B | २१-C |
| २२-C | २३-C | २४-C | २५-D | २६-A | २७-A | २८-B |
| २९-A | ३०-D | ३१-D | ३२-C | ३३-B | ३४-A | ३५-A |
| ३६-C | ३७-A | ३८-A | ३९-A | ४०-D | ४१-C | ४२-D |
| ४३-D | ४४-C | ४५-C | ४६-C | ४७-B | ४८-B | ४९-D |
| ५०-A | | | | | | |



Teachingninja.in